नि.दि.दा.क्र. २५/२०२२
विवेक वि. नंदाबाई,

<u>नि.क्र. १३ लगत आदेश</u>
(दि.१८.१०.२०२३)

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज त्यांना लेखी जबाब देणेसाठी परवानगी मिळणेबाबत दि.१३.१०.२०२२ रोजी दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर वादींचे म्हणणे मागविण्यात आले होते. दि.०७.१२.२०२२, ०७.०२.२०२३, ११.०२.२०२३, ०६.०४.२०२३, १७.०६.२०२३ आणि १८.०८.२०२३ पर्यंत वेळोवेळी संधी देऊनदेखिल वादींनी म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे वादींविरुध्द सदर अर्जास म्हणणे नाही असा हुकूम करून सदर अर्जावर न्यायाच्या दृष्टीने पुढील हुकूम करित आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ च्या मते ते आजारी असल्याने न्यायालयात हजर राहु शकले नाही व लेखी जबाब सादर करू शकले नाही. सबब, त्यांना अर्जाने लेखी जबाब सादर करण्यास परवानगी द्यावी म्हणुज अर्ज असे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दाव्याचे समन्स ०६.०६.२०२२ रोजी रूजू झाले आहे त्यानंतर १३.१०.२०२२ रोजी प्रतिवादीने सदरचा अर्ज दिला आहे. दि.प्र.सं. आदेश ८ नियम १ च्या तरतुदीनूसार प्रथमतः ३० दिवसाचे आत लेखी जबाब व म्हणणे दाखल करणेचे असून योग्य व संयुक्तीक कारण असल्यास पूढे ६० दिवसांच्या आत लेखी जबाब दाखल करता येतो. प्रतिवादी नं. १ ते ३ यांना दावा समन्स ०६.०६.२०२२ रोजी प्राप्त झाले असून ०५.०९.२०२२ पर्यंत याकामी लेखी जबाब दाखल करण्यास स्वतंत्र होते. तथापी, त्यानंतर १ महिना ७ दिवसांचा उशिर प्रतिवादींना त्यांचा लेखी जबाब व म्हणणे दाखल करण्यास झालेला दिसतो. दावा हा मालकी हक्क जाहीर होऊन मिळणेकरिता व कायम मनाई हुकूमाकरिता दाखल असून निश्चीतच वादी प्रतिवादी यांचे हक्क संबंध गुंतलेले आहे. अशास्थीतीत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना बचावाची संधी न दिलेस

दाव्यामध्ये गूंतागूंतीचे परिस्थीती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे, नैसर्गिक न्यायतत्वानूसार लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या उशिराचा विचार करता तो प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यावर दंड आकारून अर्ज मंजुर केलेस वादीचे कोणतेही पूर्वग्रह दुषित असे नुकसान होणार नाही. करिता, अर्जाच्या उत्तरादाखल मी खालील प्रमाणे आदेश पारित करिता आहे. :–

**आदेश**

१. अर्ज निशाणी १३ दंड रूपये २००/– मंजुर करण्यात येत आहे.

२. दंडाची रक्कम प्रतिवादींनी वादींना दिल्यानंतर लेखी जबाब व म्हणणे अभिलेखावर घेतले जाईल.

SHAILESH UTTAMRAO KANTHE

Digitally signed by SHAILESH UTTAMRAO KANTHE
Date: 2023.10.18 14:56:29 +0530

दि.१८.१०.२०२३.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
देऊळगावराजा.

रुपेश अशोक दांडगे,
लघुलेखक.